REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 3 | DECEMBER - 2024

# मानवनिर्मितीसाठी शिक्षण: एक समग्र तत्वज्ञान

डॉ. कृष्णा पुंजाराम भदाणे
राजर्षी शाहू कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड) ताथवडे पुणे.
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.

## सारांश

शिक्षणामध्ये काळाच्या ओघाने विविध विचारवंतांनी दिलेल्या विचारांची भर पडली आहे. विविध तत्वज्ञांनी दिलेले विचारदेखील शिक्षणामध्ये समाविष्ट झाले. शिक्षण देण्याच्या आणि घेण्याच्या विविध पदत्रधती जरी विविध तज्ज्ञांनी दिल्या असल्या तरी सर्व पदत्रघतींचे एकच उदत्रदिष्ट आहे ते म्हणजे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सर्व पदत्रधतींचे एकत्रित सार म्हणजेच मानवनिर्मित शिक्षण होय.




## प्रस्तावना -

पूर्वापार काळापासून मानव 'शिक्षण' देत-घेत आला आहे. गुरुकुल पदत्रधतीपासून सुरू असलेल्या या शिक्षण पदत्रधतीचे मानवामध्ये आमूलाग बदल घडविणे' हेच ध्येय होते आणि आजदेखील शिक्षणाचे तेच ध्येय आहे. लहान बालकापासून शिक्षण पदत्रधतीचे हे उदत्रदिष्ट साध्य करण्यास सुरूवात केली जाते, आणि उत्तरोत्तर त्याची व्यापकता वाढत जाते. विविध थोर विचारवंतांनी तसेच शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षण' या संकल्पनेचा मूलभूत विचार केला आहे. भारतातील विवेकानंद, महात्मा गांधी, राधाकृष्णनत्र, अरविंद घोष यांसारखे विचारवंत तर परदेशातील रूसो, इमरसन, पेस्टॉलॉजी, मांटेसरी, कार्ल युग, हॉवर्ड गार्डनर, इव्हान इलिच इ. शिक्षणतज्ज्ञांनी 'शिक्षण' या शब्दाचा मूलभूत विचार करून मानवाच्या जीवनातील त्याचे महत्व तर विशद केलेच शिवाय शिक्षण देण्याच्या परिणामकारक पदत्रधतीदेखील दिल्या. या विचारवंतांपूर्वी भारत व परदेशात अस्तित्वात असलेले पुरातन काळातील जैन धर्म, वैदिक धर्म, इस्लाम धर्म, वैदिक धर्म या धर्मामधील आचार्यानी (ज्येष्ट व्यक्तींनी) देखील शिक्षणाचा मूलभूत विचार करून अध्ययन अध्यापनाच्या विविध पदत्रधती विकसित केल्या आहेत, तसेच भारतात पूर्वापार काळात अस्तित्वात असलेल्या अध्यात्मवाद, आदर्शवाद यादत्रवारेही आचार्यानी शिक्षणाचे मानवाच्या विकासातील महत्व जाणून घेऊन अत्यंत परिणामकारक अशा अध्ययन अध्यापनाच्या पदत्रधतीदेखील

आपल्याकरिता उपलब्ध करून दिल्या. याच बाबी आपणास परदेशात अस्तित्वात असलेल्या कार्यवाद, अस्तित्ववाद, निसर्गवाद प्रवाहांमध्ये देखील आढळतात.

काळ कोणताही असो, शिक्षणाचा मूळ उदत्रदेश मानवाचा विकास करणे, मानवामध्ये आमूलाग्र बदल घडविणे हाच होता, आणि आजदेखील तोच उदत्रदेश आहे. विविध विचारवंतांनी व शिक्षणतज्ज्ञांनी मांडलेले शैक्षणिक विचार आणि दिलेल्या शिक्षणपदत्रधतीचे एकत्रिकरण म्हणजेच 'मानवनिर्मितीसाठी शिक्षण' (Holistic Education) होय.

## 'मानवनिर्मितीसाठी शिक्षण'- अर्थ

प्रत्येक व्यक्तीचा बौदत्रधिक, भावनिक, सामाजिक, शारीरिक, कौशल्यविषयक, सृजनशीलता, सौंदर्यविषयक, आध्यात्मिक बाबींचा त्याच्या कुवतीनुसार विकास करण्यासाठी देण्यात येणारे शिक्षण म्हणजेच मानवनिर्मितीसाठी शिक्षण होय.

यामध्ये अब्राहम मस्लो यांनी दिलेल्या 'स्व संकल्पना' तसेच व्यक्तीच्या अंतर्गत (मनातील जीवन) आणि तिथे बाहेरच्या जगातील जीवन यांमधील समन्वय, मनाचे स्वातंत्र्य, चांगली निर्णयक्षमता, प्रत्येक व्यक्तीने तिच्या 'स्वताःच्या पदत्रधतीने' अध्ययन करणे, सामाजिक कौशल्य, चारित्रयसंवर्धन, भावनिक विकास या सर्वांचा समावेश होतो. या सर्व घटकांचे विद्यार्थ्यमधील त्यांच्या क्षमतेनुसार संवर्धन करणे म्हणजेच मानवनिर्मितीत शिक्षण होय.

म्हणजेच मानवनिर्मितीचे शिक्षण हे शिक्षणाचे असे तत्वज्ञान आहे की जे व्यक्ती समाजामध्ये राहून स्वतःच्या अस्तित्वाचा अर्थ आणि हेतू साधते, नैसर्गिक जगात राहून मानवी मूल्य आत्मसात करण्याचा प्रयत्न करते, या तत्वावर आधारीत आहे.

## मानवनिर्मितीसाठीच्या शिक्षणाची सद्यस्थितीतील गरज

मातीच्या ओल्या गोळयाला जसा आकार आपण देऊ तसा घड़ा बनतो. यानुसारच संपूर्ण मानव तयार होण्यासाठी लहान वयाच्या बालकास सुसंस्कारित करणे गरजेचे असते. बालकाच्या व्यक्तिमत्वाचा पाया घडविताना कुटुंब, समाज तसेच शिवण महत्वाची भूमिका वठवित असते.


शिक्षणादत्रवारे बालकाचे चारित्र्य, विचार, संस्कार, बुदधिमत्ता, शारीरिक गुणवत्ता हे घटक घडविले जातात व तदनंतर विविध अनुभवादत्रवारा विकास केला जातो. दर्जेदार मानव किंवा संपूर्ण विकसित मानव जो स्वत:साठी, कुटुंबासाठी,देशासाठी, समाजासाठी मोलाचे कार्य करू शकतो असा मानव शिक्षणादत्रवारेच तयार करता येऊ शकतो, घडविता येऊ शकतो. सध्याच्या शिक्षण पदत्रधतीमधून फक्त बौदत्रधिक विकास झालेला, मूल्यांची जाणदेखील नसणारा, सामाजिक देणे बदत्रदल पर्वा नसणारा, शारीरिक दृष्ट्या कमकुवत, परंतु तंत्रज्ञानाची उत्तम जाण असणारा मानव घडवला जात आहे. आपल्याला परीक्षार्थी घडवायचा नसून उत्तम 'विद्यार्थी' घडवायचा आहे याचा विसर पडलेला दिसून येतो. शिक्षणाचे मूळ उदत्रदिष्ट बाजूला पडून 'धोका आणि ओका' या तत्वाचे परीक्षार्थी तयार होताना दिसत आहेत. असे परीक्षार्थी खरंचच 'उत्तम / सुसंस्कारित मानव बनतील का? याबाबत शंकाच येते. याकरीताच, भविष्यात येणा-या संकटांच्या घंटेची सूचना ओळखणे आज गरजेचे वाटते.

आपल्या समाजावर भविष्यात येणारी दर्जाहीन मानवाबाबतची संकटे टाळण्याकरिता 'मानवनिर्मितीसाठीच्या शिक्षणा' ची गरज आहे. ही संकल्पना २० वर्षापासून अस्तित्वात आल्याचे दिसून येते. परंतु भारतीय शिक्षणपदत्रधतीमध्ये मात्र सदर संकल्पना वैदिक काळापासून अस्तित्वात असल्याचे दिसते. तसेच आदर्शवाद, अध्यात्मवाद यांचा अभ्यास केल्यानंतरदेशील

आपणास त्यामध्येही 'मानवनिर्मितीसाठीचे शिक्षण' ही संकल्पना अस्तित्वात असल्याचे आढळून येते. सामाजिक विकासासाठी सहाय्यभूत ठरणारा महत्वाचा घटक घडविणे, हे शिक्षणाचे आद्यकर्तव्य आहे याचा विचार करूनच आचार्यांनी या शिक्षणाची रचना केली होती. याच शिक्षणपदत्रधतीची आजदेखील गरज आहे.

## मानवनिर्मितीसाठीच्या शिक्षणाच्या अंमलबजावणीचे मार्ग -

मानवनिर्मितीसाठीचे शिक्षण म्हणजे कोणतेही एक तंत्र नव्हे. 'शिक्षण' या अंतर्गत येणा-या सर्व घटकांचा एकमेकांशी संबंध आणि त्यादत्रवारे साध्य केलेले पूर्णत्त्व ह्यद्वहेल्एन्एस्सह यांदत्रवारे मानवनिर्मितीसाठीचे अध्ययन घडून येईल. अर्थातच शिक्षक, पालक, अभ्यासक्रम, अध्यापनपदत्रधती हे सर्व घटक वेगवेगळे न राहता त्यांनी एकमेकाच्या हातात हात घेऊन एकत्रितरित्या प्रयत्न करणे आवश्यक झाले आहे. अब्राहम मॅस्लो यांनी दिलेली 'स्व संकल्पना' मानवनिर्मितीसाठीच्या शिक्षणाशी तंतोतंत जुळते. प्रत्येक व्यक्तीच्या बौदत्रधिक, भावनिक, सामाजिक, सौदर्यविषयक, मूल्यात्मक, आध्यात्मिक विकासाशी याचा संबंध आहे. हा अनेक पैलूंदत्रबारे साधला जाणारा विकास वर्तमानकाळात अध्ययन अध्यापनादत्रवारे खालीलप्रमाणे आपणास साधता येईल.




विद्यार्थ्यास केंद्रबिंदु ठेवून समाज, शिक्षक, पालक यांनी विद्यार्थी 'घडविण्यासाठी' प्रयत्न करणे गरजेचे आहे - याद्दष्टीने खालील प्रमुख मार्ग स्विकारता /अमलात आणता येतील.

अभ्यासक्रम तयार करताना विद्यार्थ्यांच्या वयाचा तसेच त्याच वयातील विविध बुदत्रधिमत्तेच्या विद्यार्थ्यांचा विचार करून अभ्यासक्रम बनविला जावा. अर्थातच कोणा तज्ज्ञ व्यक्तीने अभ्यासक्रमाची रचना करणे आवश्यक वाटत नाही. पालक, शिक्षक, समाजातील महत्वाचे घटक (व्यक्ती) या सर्वांनी एकत्र येऊन परस्परांच्या सहकार्याने व संमतीने अभ्यासक्रम तयार करणे आवश्यक वाटते.

परंतु संपूर्ण मानव घडवण्याकरिता निश्चितच मूल्यांना प्राथमिक स्थान आहे आशा मधून मूल्य रुजवल्यास विद्यार्थ्यांना आशय लक्षात राहतो परंतु मूल्य लक्षात येतेच असे नाही म्हणून अशास प्रथम स्थान न देता मूल्यांना प्रथम स्थान देऊन मूल्यांमधून आशय (पाठ्यक्रम,विषय ) अध्यापन करणे उपयुक्त ठरेल ज्याद्वारे विद्यार्थी प्रथम मूल्य आत्मसात करतील.

विद्यार्थ्यांना शाळांमधून विविध विषयांचे ज्ञान दिले जाते अर्थातच आज त्या विषयाचे स्वतःचे अस्तित्व राखून ज्ञान दिले जाते. परतु मानवनिर्मितीसाठीचे शिक्षण आपणास अवलंवण्यासाठी ज्ञान हे तुकडयात न देता ते पूर्णत्त्वाने म्हणजेच एकमेकांशी संबंध विशद करून देणे महत्वाचे आहे. म्हणून आज विविध विषयांचे विद्यार्थ्यांना अध्यापन त्या विषयांचा एकमेकांशी संबंध

विशद करून ज्ञान द्यावे. तसेच विषयांतील दैनंदिन जीवनातील महत्व व उपयोगदेखील स्पष्ट केल्यास विद्यार्थ्यांना आत्मसात करण्यास उपयुक्त ठरेल.

आज शिक्षकांनी 'शिक्षक' बनून अध्यापन करण्यापेक्षा 'गुरू' वनून अध्यापन करणे गरजेचे आहे. यादत्रवारे शिक्षक विद्यार्थ्यांच्या आत्म्यापर्यंत पोहोचू शकतील आणि त्यांच्यातील कौशल्य, भावना जागृत करून विद्यार्थ्यांच्या 'स्व'त्त्वाचा विकाम करू शकतील. तसेच विद्यार्थ्यांच्या शरीर, मन, भावना यांचा संबंध विद्यार्थ्याच्याही लक्षात आणून देता येईल.

### याशिवाय आणखी काही मार्ग खालीलप्रमाणे –

- नवीन तंत्रज्ञानावर अधिक भर देण्यापेक्षा विद्यार्थ्यांना अधिक बोलते करणे, त्यांचे विचार मांडण्यास अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे.
- वहुविध वुदत्रधिमत्ता विकसनास महत्व देणे.
- प्रत्येक बालकामध्ये परमेश्वरी शक्ती, परमेश्वरी देणगी दडलेली असते सदत्रसदविवेकबुदत्रधीच्या आधारे आपण त्यास जागृत करून तिचा विकास करणे.
- सहकार्यात्मक अध्ययन, चर्चा पदत्रधत, प्रायोगिक पदत्रधत, गटकार्य, प्रकल्प पदत्रधत, यांसारख्या संप्रेषणावर भर देणा-या अध्यापनपदत्रधतींचा अवलंब जास्तीत जास्त करावा.
- वर्गातील विविध बुदत्रधिमत्तेच्या विद्यार्थ्यांना तसेच कौशल्यविकसनास महत्व / भर देणे.
- विद्याथ्यांमधील स्पर्धेपेक्षा सहकार्यावर भर देणे.
- अब्राहम मॅस्लो यांनी दिलेल्या 'स्वसंकल्पना' विकसनास महत्व देणे.
- समाजात राहून सामाजिक संबंध जपणारे व विकसित करणारे शिक्षण देणे.
- विविध प्रकल्पाचा अवलंब करून विद्यार्थ्यांचे मनोकायिक कौशल्य विकसित करणे.
- अध्ययनांच्या माध्यमापेक्षा ह्यंएदुम्हि विद्यार्थ्यांच्या विचारांना पैलू पाडण्यावर भर देणे आवश्यक आहे.
- अभ्यासक्रम लवचिक असावा.
- हॉवर्ड गार्डनर यांनी दिलेले भाषिक बुदत्रधिमत्ता, आंतरव्यक्तिक वुदत्रधिमत्ता, व्यक्तिअंतर्गत बुदत्रधिमत्ता विकसित करण्यास महत्त्व देणे.
- वर्गातील विद्यार्थीसंख्या कमी करणे.
- आव्हान स्विकारणे व ते दूर करण्यास, सोडविण्यास प्रयत्न करणे, आव्हान सोडविणे यांसारख्या कौशल्यांचा विकास करणे.

### समारोप -

'मानवनिर्मितीसाठीचे शिक्षण' हे सर्व तत्त्वज्ञानांचे एकत्रिकरण असून निश्चितच ख-या अर्थाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असे तत्त्वज्ञान आहे. आजच्या विद्यार्थ्यासाठी आवश्यक असे हे तत्त्वज्ञान अवलंबिल्यास निश्चितच भविष्यकाळासाठी उपयुक्त मानव आपण घडवू शकु यात शंकाच नाही. अर्थात यासाठी समाज, शिक्षक, पालक यांनी परस्पर सहकार्याने व पुढाकाराने काम करणे गरजेचे आहे.

## REFERENCES -


1. www.google.com
2. www.wikipedia.com
3. भारतीय शिक्षण - जानेवारी २०११